गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया संदर्भात राज्यस्तरावर स्थापन करण्यात आलेली समिती पुर्नगठित करणे व जिल्हास्तरीय समिती गठीत करणे .

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रचिनि -३१२६/प्र.क्र. १२/कु.क.२(ई-१५४६९९५)
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला, बी- विंग,
मंत्रालय, एल.टी.मार्ग, मुंबई -४०० ००१.
दिनांक :- २५ फेब्रुवारी, २०२६

**वाचा -**

१) सार्वजनिक आरोगय विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण:-२०१९ / ३३० / प्र. क्र. २०५ / कु.क,दि.२६ जुन ,२०१९ .
२) अतिरिक्त संचालक,राज्य कुटुंक कल्याण कार्यालय,पुणे यांचे पत्र क्र राकुका / माता आरोग्य कक्ष १०(ब) /नस्ती.क्र./ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत उपाययोजना व मार्गदर्शक सुचना संदर्भात समिती पुनर्गठीत करण्याबाबत/२०२५,१०४३-४६,दि.०७.०१.२०२६

**प्रस्तावना :-**

बीड जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियोसंदर्भात (Hysterectomy) तपासणी करण्यासाठी संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक २६ जुन,२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. मा. मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१० जून,२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार ,ऊसतोड महिला कामगारांच्या समस्यांबाबत राज्यस्तरीय समितीची पुनर्गठन आणि नव्याने जिल्हास्तरावर समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत उपाययोजना ,मार्गदर्शक सुचना आणि शासनास शिफारशी करण्यासंदर्भात राज्यस्तरावरील समिती पुर्नगठित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | सदस्याचे नाव /पदनाम | सदस्यत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | मा.डॉ.(श्रीम) निलम गो-हे,उपसभापती,महाराष्ट्र विधानपरिषद | अध्यक्ष |
| २ | मा.डॉ.(श्रीम) मनीषा कायंदे, विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ३ | मा.( श्रीम) नमिता मुंदडा,विधान सभा सदस्य ,केज.जि.बीड | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (१) सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ५ | संचालक, (प्राथमिक) आरोग्य सेवा,पुणे | सदस्य |
| ६ | सहसंचालक (रुग्णालये राज्यस्तर) आरोग्य सेवा रुग्णालय , पुणे | सदस्य |
| ७ | प्राध्यापक आणि विभाग प्रमुख ( स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई,बीड . | सदस्य |
| ८ | विभाग प्रमुख,प्रसूती / स्त्रीरोग तज्ञ,जिल्हा रुग्णालय,बीड . | सदस्य |
| ९ | प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग ) वैद्यकीय महाविद्यालय,छत्रपती संभाजी नगर. | सदस्य |
| १० | डॉ.मंगेश गढरी, हेल्थ स्पेशालिस्ट,युनिसेफ,महाराष्ट्र. | सदस्य |
| ११ | डॉ. निशिकांत वारभुवन,स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ,नांदेड | सदस्य |
| १२ | ॲड.श्रीमती संगीता चव्हाण ,बीङ | सदस्य |
| १३ | उपसंचालक, आरोग्य सेवा,लातूर. | सदस्य |
| १४ | उपसंचालक, आरोग्य सेवा,छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| १५ | अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय,पुणे | सदस्य सचिव |

३. समितीची कार्यकक्षा.

१. मागील ३ वर्षतील राज्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत अभ्यास करणे तसेच जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीनुसार त्यावर उपाययोजना सुचविणे.

२. मागील ३ वर्षात राज्यामध्ये खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत (Hysterectomy) तपासणी करणे .

३. या शस्त्रक्रिया केलेल्या महिलांच्या संदर्भात तांत्रिक अभ्यास करुन यासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायीकांच्या स्तरावर उपलब्ध असलेला अभिलेख आणि प्रत्यक्षात काही महिलांच्या मुलाखती घेऊन दिलेले माहितीची पडताळणी करणे.

४. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करणे.

५. अनावश्यक शस्त्रक्रियांना प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरावरील समितीच्या शिफारशींचा विचार करुन शासनास उपायायोजना सुचविणे.

६. सदर समितीची बैठक वर्षातून किमान **२ वेळा** आयोजित करणे.

४. तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **सदस्यांचे नाव/पदनाम** | **सदस्यत्वाचा प्रकार** |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी. | अध्यक्ष |
| २ | प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र विभाग) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अथवा** विभाग प्रमुख, प्रसूती विभाग /सत्रीरोग तज्ञ, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४ | अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ५ | स्थानिक Federation of Obstetric and Gynecological Societies of India. (FOGSI) समितीचे अध्यक्ष | सदस्य |
| ६ | स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | जिल्हा शल्य चिककित्सक | सदस्य सचिव |

५. समितीची कार्यकक्षा .

१. मागील ३ वर्षातील जिल्ह्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत तपासणी करणे .

२. खाजगी रुग्णलयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत (Hysterectomy) तपासणी करणे.

३. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करणे .

४. अनावश्यक शस्त्रक्रियांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययायेजना बाबतच्या शिफारशी राज्यस्तर समितीस करतील .

५. सदर समितीची बैठक वर्षातून किमान **२ वेळा** आयोजित करणे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०२२५१००५१२३४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAIBHAV GAJANAN KOSHTI

Digitally signed by VAIBHAV GAJANAN KOSHTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=5749df8e46703e97e25555afe696d0a51badfa2373ccdc83593e18af18e92f1a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47C0ABB5437C6B09C621CCA6C499475684F37EA0F5529DD3EF3D6E6B3326E747, cn=VAIBHAV GAJANAN KOSHTI
Date: 2026.02.25 14:13:44 +05'30'

**( वैभव ग. कोष्टी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण ) यांचे खाजगी सचिव .
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण ) यांचे खाजगी सचिव .
४. डॉ.(श्रीमती) निलम गो-हे, उपसभापती ,महाराष्ट्र विधानपरिषद .
५. डॉ.नमिता मुंदडा विधान सभा सदस्य.
६. डॉ.(श्रीम) मनीषा कायंदे, विधान परिषद सदस्य.
७. प्रधान सचिव (१) सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
८. सचिव (२) सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय,मुंबई .
९. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी .
१०.सर्व सह /उप सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
११.संचालक (प्राथमिक )आरोग्य सेवा ,पुणे
१२. अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा ,कुटुंब कल्याण,पुणे
१३.सह संचालक (रुग्णालये राज्यस्तरीय) आरोग्य सेवा आयुक्तालय,पुणे.

१४.प्राध्यापक आणि विभाग प्रमुख स्वामी रामानंद तीर्थ (स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई, बीड.

१५.विभाग प्रमुख,प्रसूती/स्त्रीरोग तज्ञ,जिल्हा रुग्णालय,बीड

१६.प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग) वैद्यकीय महाविद्यालय,छत्रपती संभाजीनगर.

१७.डॉ.मंगेश गढरी,हेल्थ स्पेशालिस्ट,युनिसेफ (अति.संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांचे मार्फत)

१८.डॉ.निशिकांत वारभुवन,स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ,नांदेड (अति.संचालक, राज्य कुटुंब कल्याण,पुणे यांचे मार्फत)

१९.ॲड संगिता चव्हाण,बीड (अति.संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांचे मार्फत)

२०.उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर

२१.उपसंचालक, आरोग्य सेवा,छत्रपती संभाजीनगर.

२२.सर्व विभाग प्रमुख,प्रसूती विभाग /स्त्रीरोग तज्ञ,जिल्हा रुग्णालय

२३.सर्व प्राध्यापक आणि विभाग (स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय.

२४.जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद (सर्व)

२५.जिल्हा शल्य चिकित्सक /अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय (सर्व)

२६.स्थानिक Federation of Obstetric and Gynecological Societies of India. (FOGSI) समितीचे अध्यक्ष (अति. संचालक, राज्य कुटुंब कार्यालय,पुणे यांचे मार्फत)

२७.स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी ( अति.संचालक ,राज्य कुटुंक कल्याण कार्यालया,पुणे यांचे मार्फत).

२८. निवड नस्ती (कुटुंब कल्याण १/२)